सिटी स्कॅन
सोमवार, २४ नोव्हेंबर २०१४
अहमदनगर

# शिक्षकांसाठी विपश्यना परिचय कार्यक्रम उद्या

प्रतिनिधी | नगर

शिक्षकांना विपश्यनेचे माहिती मिळावी, म्हणून महाराष्ट्र सरकारने 'विपश्यना मित्र' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमात शिक्षकांसाठी वेगवेगळ्या विपश्यना केंद्रांवर शिबिरांचे आयोजन केले जाते. राज्यात आतापर्यंत दहा हजार शिक्षकांनी विपश्यना शिबिरात सहभाग घेतला आहे. नगर शहर व जिल्ह्यातील शिक्षकांना विश्यनेची माहिती देण्यासाठी विपश्यना उद्बोधन वर्गाचे आयोजन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने केले आहे. मंगळवारी (२५ नोव्हेंबर) सकाळी ११ वाजता दिल्ली दरवाजाजवळील दादासाहेब रूपवते संबोधी विद्यालयात हा कार्यक्रम होणार आहे.

इगतपुरी विपश्यना केंद्राचे संचालक दिलीप देशपांडे, विपश्यना मित्र उपक्रमाचे महाराष्ट्राचे संयोजक व मुंबई महापालिका उपायुक्त शांताराम शिंदे, तसेच विपश्यना राज्य समितीचे सदस्य हेरंब कुलकर्णी या वेळी मार्गदर्शन करतील. प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस व माध्यमिक शिक्षणाधिकारी सुनंदा ठुबे या वेळी उपस्थित राहणार आहेत. विपश्यना शिबिराला जाऊ इच्छिणाऱ्या शिक्षकांनी आपल्या तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन विपश्यना मित्र प्रकल्पाचे जिल्हा प्रतिनिधी भवानराव थोरात व जगदीश असावा यांनी केले आहे.